महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES

डॉ.आ.ना.सुर्यकर
पीएच.डी.,एफएसीबीआय
कुलसचिव

वणी रोड, म्हसरुळ, नाशिक-४२२००४
Vani Road, Mhasrul, Nashik-422004
Phone : 0253 -2539230/232EPABX:0253-2539100-300/Fax:0253-2539231/23
E-mail: eligibility@muhsnashik.com / Web: www.muhsnashik.com
Ph. No. : 0253-2539230/232

जा.क्र.मआविवि/सीओ/८३९/२०११ दिनांकः २५/०५/२०११

परीपत्रक

प्रति,
मा.अधिष्ठाता / प्राचार्य,
विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये.

विषय :- महाराष्ट्र शासन निर्णयाप्रमाणे राखीव संवर्गासाठी आरक्षित जागेवरील विद्यार्थी प्रवेशाबाबत...

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
शासन परीपत्रक क्र.सीबीसी-१२९०/२३११६/प्र.क्र.-३७८/मावक - ५ दि.२४/०८/१९९५

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व महाराष्ट्र शासनाचे संदर्भिय परीपत्रकांन्वये आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने राखीव संवर्गाकरीता आरक्षित केलेल्या जागेवरील सामाजिक व शैक्षणिक लाभ घेण्यास केवळ महाराष्ट्र राज्यातील मुळ रहिवासी असलेले व्यक्तीच पात्र आहेत. महाराष्ट्र राज्यातील मुळ रहीवासी वगळता इतर राज्यातील महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत व्यक्तींनां महाराष्ट्र राज्यातील सदर सवलती अनुज्ञेय नाही. तथापि, सक्षम प्राधिकारी व महाविद्यालय व्यवस्थापनामार्फत महाराष्ट्र शासनाने राखीव संवर्गाकरीता आरक्षित केलेल्या जागेवर इतर राज्यातील मुळ रहीवासी असलेल्या राखीव सवंर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्याचे आढळुन आले आहे.

उक्त परिपत्रकाच्या तरतुदी विचारात घेता असे स्पष्ट करण्यात येते की, शासनाने विहित केलेल्या नियमानुसार राखीव संवर्गातील आरक्षित जागेवर केवळ महाराष्ट्र राज्यातील मुळ रहीवासी असलेल्या विद्यार्थ्यांनाच प्रवेश देण्यात यावे. शासन निर्धारीत राखीव संवर्गातील आरक्षित जागेवर इतर राज्यातील मुळ रहीवासी असलेल्या राखीव संवर्गातील विद्यार्थ्यांचे प्रवेश नोंदणी व पात्रतेसाठी विद्यापीठाद्वारे ग्राहय धरण्यात येणार नाही. तसेच, सदर विद्यार्थ्यांचे उक्त बाबीमुळे शैक्षणिक नुकसान झाल्यास, त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही, याची कृपया नोंद घेण्यात यावी. राखीव संवर्गासाठी आरक्षित करण्यात आलेल्या जागेवरील विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया करतांना उपरोक्त महाराष्ट्र शासन निर्णयाची काटेकोरपणे अमंलबजावणी करण्यात यावी.

आपला,

सही/-

कुलसचिव

सोबत : शासन परीपत्रक क्र.सीबीसी-१२९०/२३११६/प्र.क्र.३७८/मावक-५ दि.२४/०८/१९९५ ची प्रत

माहितीस्तव प्रत :

१. संचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय,
४ था मजला, सेंन्ट जॉर्ज हॉस्पिटल कंपाउंड,
मुंबई - ४०० ००१.

२. आयुर्वेद संचालक,
आयुर्वेद संचालनालय,
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय,
४ था मजला, सेंन्ट जॉर्ज हॉस्पिटल कंपाउंड,
मुंबई - ४०० ००१.

३. सक्षम प्राधिकारी,
महाराष्ट्र खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय व दंत महाविद्यालय व्यवस्थापन संघटना,
श्रीजी हाऊस, ७५ मिंट रोड,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

४. सक्षम प्राधिकारी,
महाराष्ट्र होमिओपॅथी महाविद्यालय व्यवस्थापन संघटना,
मेंझ्झानाईन फ्लोर, श्रीजी हाऊस, ७५ मिंट रोड,
फोर्ट , मुंबई - ४०० ००१.

५. सक्षम प्राधिकारी,
महाराष्ट्र आयुर्वेद महाविद्यालय व्यवस्थापन संघटना,
द्वारा- सप्तश्रृंगी आयुर्वेद महाविद्यालय,
कॅम्पस कमल नगर, हिरावाडी, पंचवटी,
नाशिक - ४२२ ०३०.

**Governments Resolution.**